# ॐ श्री साईराम
# प्रश्नोत्तरे ७३-७४

प्रशांती संदेशच्या प्रश्नोत्तरांच्या सत्रात आपले स्वागत असो.

आपण आज एका मनोरंजक प्रश्नाकडे बघणार आहोत.

**जर जीवन एक स्वप्न आहे तर त्यात आपल्याला अवताराची मदत कशी होते?**

फारच छान प्रश्न आहे हा! कारण एका अर्थाने जीवन म्हणजे भ्रम आहे, असत्य आहे, एक स्वप्न आहे, संपूर्ण जग हे रंगमंच आहे. स्त्री-पुरुष त्यातील पात्रे आहेत असे आपण म्हणतो. अशा सगळ्या गोष्टी आपण म्हणत असतो. अशा परिस्थितीमध्ये अवतार कशी मदत करत असेल? स्वामींनी याबद्दल सांगितलेले काही विचार मी तुमच्यासमोर ठेवतो. अवतारसुद्धा एक नट आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भगवान बाबांनी स्वत: उद्घोषित केले होते की पूर्वी या नाटकात ईश्वराने ही भूमिका कशी केली होती? कृष्णाने ही भूमिका कशी केली होती हे तुम्ही बघितले आहे.

ते म्हणाले, नाटकाला जाणून घ्या आणि पूर्वी काय झाले आणि वर्तमानात नाटकात काय होते आहे ते लक्ष देऊन बघा आणि त्याची मजा घ्या. ते नाटक तेव्हा होते. हे नाटक आत्ता आहे. तुम्ही स्वत: बघा आणि काही प्रमाणात मजा घ्या.

यातून त्यांनी स्पष्ट केले आहे हे सगळे नाटक असून अवताराला त्यातून सुटका नाही. तोसुद्धा एक नट आहे. पण एक मात्र पक्के लक्षात ठेवायला हवे, ते म्हणजे स्वामींनीच सांगितले होते की ते नट आहेत आणि त्याचवेळी सूत्रधारसुद्धा आहेत. म्हणजे ते नट आणि दिग्दर्शक आहेत. असे भगवान म्हणाले होते.

दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ते पात्रधारी म्हणजे नटाची भूमिका करतात कारण त्यांना या जगात आपण आपली भूमिका कशी केली पाहिजे हे सांगायचे असते आणि सूत्रधार (दिग्दर्शक) म्हणजे जो हे सगळे ठरवतो तो. प्रत्येक निर्णय त्यांच्या हातात आहे. ते संपूर्ण नाटकाचे दिग्दर्शन करतात. म्हणून अवतार हा 'पात्रधारी' आणि 'सूत्रधारी' आहे.

दुसऱ्या शब्दात सांगायचे तर आपण त्याला 'लीला' म्हणतो. लीला म्हणजे दैवी नाट्य किंवा दैवी खेळ. आपण त्या अर्थाने घेतले पाहिजे. फक्त ईश्वरच हा दैवी खेळ अत्युत्कृष्ट खेळू शकतो. जरी भविष्यात काय होणार हे त्याला माहीत असले तरीसुद्धा, तसेच पूर्वी (भूतकाळात) काय घडले आहे हेसुद्धा त्याला माहीत असते तरी पण या दोन्ही गोष्टी माहीत नसल्याप्रमाणे तो कृती करतो. तो पात्रधारी असतो. जेव्हा त्याने हाती घेतलेले कार्य पूर्ण झाले आहे हे तो बघतो तेव्हा आपल्याला तो दिग्दर्शक, सूत्रधारसुद्धा आहे याचा अनुभव येतो.

एकदा ते म्हणाले होते की ईश्वर फक्त रस्त्याच्या बाजूला असलेल्या नामफलकाचे काम करतो. हा रस्त्याच्या कडेचा नामफलक विविध ठिकाणी जाणाऱ्या दिशा निर्देशित करतो. म्हणून तो मार्ग दाखवतो. तुम्हाला कुठली दिशा घ्यायची आणि मार्गक्रमण करायचे हे ठरवायचे असते. तुम्ही हे समजून घेतले पाहिजे. भगवान बाबांना समजून घ्या, त्यांच्याकडे बघा, त्यांच्यात सहभागी व्हा. आपले जीवन खरे आनंदमयी होईल. नंतर आपल्याला कधीच दु:ख होणार नाही. जीवनाचे नाट्य मजेत जगा. आपण खूप आनंदी असले पाहिजे, उत्साही असले पाहिजे म्हणजे आपल्याला जीवनाचा आनंद घेता येईल. स्वामी म्हणत असत एरंडेल प्यायलासारखा चेहरा करू नका, उगीच गंभीर, त्रिकोणी चेहरा करू नका. शेवटी काय तर जीवन हे स्वप्न आहे, हे जाणा! स्वामी म्हणत असत ते स्वप्न आहे हे लक्षात घ्या आणि त्याच्यात रडण्यासारखे, शोक करण्यासारखे, किंवा दु:ख करण्यासारखी गोष्टच नाही. आजिबात नाही! हे नाट्य बघा आणि त्याची मजा घ्या. आपल्याला या जीवनात सहभागी करून घेतल्याबद्दल आपण कृतज्ञ राहूया. या नाटकात भूमिका मिळाल्याबद्दल कृतज्ञ राहूयात.

आपण नाटकात कृतीशील राहून मजेत राहूयात. हीच खरी मुक्ती. यालाच सुटका म्हणतात, उद्धार म्हणतात.

जीवनात घडणाऱ्या घटनांकडे गांभीर्याने न बघता ते स्वप्न किंवा नाट्य आहे या दृष्टिकोनातून बघावे, असे जीवनाबद्दलच्या प्रश्नाकडे बघावे. वेगवेगळ्या परिस्थितीने, घटनांनी त्यातच वहावत जाऊ नये. फक्त या खेळाची मजा लुटा, बस्स! खेळाची मौज अनुभवा. तुमची भूमिका चोख पार पाडा, म्हणजे शेवटी तुम्हाला म्हणता येईल की, ''हे ईश्वरा! तू मला दिलेली भूमिका मी उत्तम पार पाडली आहे.'' जेव्हा पडदा खाली पडेल तेव्हा या नाटकाच्या शेवटी आपल्याला समाधान प्राप्त होईल. आपण आपल्याकडून सर्वोत्तम केल्याचे सर्वश्रेष्ठ समाधान आपल्याला प्राप्त होईल.

हे विचारलेल्या एका प्रश्नाबद्दल झाले. आता दुसऱ्या प्रश्नाकडे वळू या.

आदर्श साई कुटुंबाबद्दल आपले काय मत आहे? हो! आदर्श साई कुटुंब.

कुठलेही आदर्श कुटुंब हे साई कुटुंब असते. साई कुटुंब हे इतर कुटुंबापेक्षा वेगळे नाही. जे कुटुंब आदर्श असते, त्याला तुम्ही आदर्श साई कुटुंब म्हणू शकता. जसे आपण हाताने जेवताना सगळी बोटे एकत्रितपणे त्यात सहभागी असतात तसे कुटुंबातील सगळ्या व्यक्तींनी एकोप्याने राहणे, वागणे म्हणजे आदर्श वागणे. सगळी पाची बोटे एकत्रित आल्याशिवाय जेवता येत नाही. तसेच कुटुंबात एकोपा आवश्यक आहे. आत्म्याची एकता आवश्यक आहे आणि त्या गोष्टीवर आपण काम केले पाहिजे.

त्याच्या स्वत:च्या जीवनातील मागण्या काही असतील तरी सगळ्यांनी कुटुंबाची प्रतिष्ठा आणि पत राखण्यासाठी जगले पाहिले. जेव्हा स्वामी शाळकरी विद्यार्थी होते तेव्हा त्यांना लांब शाळेत चालत जावे लागे. ते चालत जात. त्यांनी वडिलांकडे कधी पैसे मागितले नाहीत. तसेच कुणाकडून पैसे उसने घेतले नाहीत. तसेच कुणी त्यांना पैसे द्यायला पुढे सरसावला तरी त्यांनी त्याचा स्वीकार केला नाही. स्वच्छ शब्दात त्याला नकार दिला. याचे कारण स्वामींनी स्वत: दिले ते म्हणजे कुटुंबाची प्रतिष्ठा राखणे महत्त्वाचे. म्हणून कुटुंबातील सदस्यांनी हे कायम लक्षात ठेवायचे की कुटुंबाची प्रतिष्ठा राखली पाहिजे. ती किर्ती फार महत्त्वाची आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे कुटुंबातील सगळ्यांनी ईश्वर पूजन, भजन, आरती आणि आध्यात्मिक कार्यात एकत्र आले पाहिजे. आध्यात्मिक कार्यातील सहभाग त्यांना शांती, आनंद, यश, किर्ती प्रदान करेल आणि सगळे सारखेच, समान पातळीवर आहेत. कौटुंबिक आध्यात्मिक कार्यात सगळ्यांचा सारखाच सहभाग ही एकत्वाची, समानतेची भावना विकसित करायला मदत करते. म्हणूनच आचार संहितेच्या नऊ कलमांमध्ये कौटुंबिक भजनावर, संकिर्तनावर भर दिला आहे. हा आध्यात्मिक दृष्टिकोन झाला. पुढे स्वामी म्हणतात की मुलांनी त्यांच्या पालकांचा आदर केला पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे, त्यांना आनंद दिला पाहिजे.

एकदा एक माजी विद्यार्थी स्वामींकडे आला. त्याने त्यांना नमस्कार केला तेव्हा स्वामींनी त्याला विचारले, पुढे काय करायचा विचार आहे? त्याचे पीएच.डी. झाले होते. मुलगा म्हणाला, ''स्वामी, मला तुमची सेवा करायची आहे.''

तेव्हा स्वामी ताबडतोब म्हणाले, ''मला तुझी सेवा नको. मी तुझी सेवा करतो, तुला माझी सेवा का करायची आहे? तू तुझ्या पालकांची सेवा कर हे मला हवे आहे. त्यांची सेवा म्हणजे माझीच सेवा. पालकांची सेवा म्हणजे स्वामींची स्वत:चीच सेवा होय.'' तुम्ही पालकांना आनंद दिलात तर मला खूप आनंद होईल. पुढे ते म्हणाले, ''तुझ्या पालकांवर प्रेम कर. त्यांचा आदर कर. त्यांना आनंद दे. कुठल्याही कारणाने तुझ्या वागण्यामुळे त्यांच्या डोळ्यात पाणी येता कामा नये. कारण भविष्यात तुला त्याची किंमत मोजावी लागेल. आज तू तुझ्या पालकांना रडवलेस तर उद्या तुझी मुले तुला रडवतील. प्रतिक्रिया, प्रतिबिंब, प्रतिध्वनी. म्हणून पालकांचा प्रेमपूर्वक आदर करावा, तसेच कुटुंबातल्या इतर सदस्यांमध्ये सुद्धा प्रेम असावे. पालकांनी याचे उदाहरण घालून द्याचे. मुलांसमोर पालकांनी वादविवाद करू नयेत, मतभेद दाखवू नयेत. जर पालक सकाळी

अंथरुणातून उठल्या उठल्या वादविवाद करायला लागले तर मुले सुद्धा सकाळी उठल्याबरोबर भांडायला लागतील. ही योग्य पद्धत नाही. म्हणून पालकांनी मुलांना आदर्श उदाहरण घालून दिले पाहिजे म्हणजे मुले पुढे तशी बनतील. याचा अर्थ एक उत्तम उदाहरण समोर ठेवले पाहिजे.

पुढे स्वामी म्हणाले, ''छडीचा वापर टाळला तर मुलगा बिघडला.'' मुलाला योग्य मार्गावर आणण्यासाठी गरज असेल ते करावे. ते महत्वाचे. तिथे तडजोड नको. पालकांनी मुलांना प्रोत्साहन दिले पाहिजे, पण त्याच वेळी ते जर चुकीच्या मार्गावर जात असतील तर त्यांचा विरोध केला पाहिजे, शिक्षा केली पाहिजे. ताकीद दिली पाहिजे.

स्वामींनी इथे धृतराष्ट्राचे उदाहरण दिले. त्याने कधीही दुर्योधनाला चुकीच्या वागण्याबद्दल टोकले नाही. त्याच्या वागण्याकडे दुर्लक्ष केले. त्याचा शेवटी परिणाम काय झाला? त्याचा आणि सर्व कुटुंबाचा सर्वनाश झाला. सगळे लढाईत हरले. असे तुमचे आंधळे प्रेम असता कामा नये. अविवेकी, कुठल्याही समजुतीशिवाय असले प्रेम असता कामा नये. शिक्षासुद्धा प्रेमाचे प्रगटीकरण आहे. जेव्हा डॉक्टर औषध देतो ते कडू असते. इंजेक्शन दुखते. तो का देतो? तर रुग्णाला बरे वाटावे म्हणून. तसेच पालक मुलांना शिक्षा करतात, मुले रडतात त्याचा अर्थ त्यांचे मुलांवर प्रेम नाही असा होत नाही. शिक्षासुद्धा प्रेमाचा प्रकार आहे हे आपण समजून घेतले पाहिजे.

मुलांनी सुद्धा पालकांकडे अवाजवी मागण्या करून त्यांच्यावर भारभूत होऊ नये. त्यांना कधीच त्रास देवू नये. मुलांनी आपल्या पालकांची परिस्थिती समजून घेतली पाहिजे. कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांना समजून घेतलेच पाहिजे.

बाबा एकदा म्हणाले होते की आई प्रथम मुलाला 'हे तुझे वडील आहेत' अशी ओळख करून देते. नाहीतर मुलाला कसे कळणार की कोण त्याचे वडील आहेत. म्हणून आई मुलाला वडिलांकडे नेते. नंतर वडील मुलाला गुरुकडे नेतात. पुढे गुरू किंवा शिक्षक मुलाला देवाकडे जाण्याचा मार्ग दाखवतात. म्हणून माता, पिता, गुरु, ईश्वर अशा पायऱ्या आहेत. यात एक जण फक्त काळजी घेण्यासाठी. पुढच्या विकासासाठी मुलाला दुसऱ्याकडे सोपवते. अशा प्रकारे शेवटी तो स्वत:ला समजण्याच्या स्थितीत पोचतो. बालकाची जाणीवेची स्थिती ईश्वराच्या खूप जवळची असते. म्हणून पालकांनी सर्व दृष्टीने त्यात साधन बनायचे आहे. ते एकदा असेही म्हणाले होते की पालकांनी मुलाला जन्म दिलेला नसून, मुले पालकांच्या माध्यमातून जन्माला येतात, एवढेच. म्हणून मुले पालकांच्या माध्यमातून जन्म घेतात. पण पालकांपासून जन्माला येत नाहीत. जेव्हा आपल्याला हे समजेल, पालकांना समजेल तेव्हा त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव होईल. तसेच त्यांच्या सीमाही जाणवतील.

स्वामींनी अशी खूप उदाहरणे दिली आहेत. जसे भीष्मांचे त्यांच्या पित्याप्रती प्रेम आणि ध्रुवाच्या मातेचे त्याच्याप्रती असलेले प्रेम. ध्रुवाच्या मातेने त्याला तपश्चर्येला पाठवले त्याला ईश्वराकडे पाठवले. या प्रेमाला काय म्हणायचे? हे प्रेम सर्वोच्च प्रेम आहे. आई प्रत्येकाला मार्गदर्शन करते म्हणून ती जबाबदार आहे. मातेने शिवाजीला सम्राट म्हणून घडवले. मातेने गांधीजींना महात्मा बनवले. माता अवतारांना जन्म देते. आई, वडिल, मुलांच्या भूमिका कशा असाव्यात याबद्दल स्वामींनी अगदी स्पष्टपणे सांगितले आहे.

म्हणून आदर्श कुटुंबांमध्ये सगळे सदस्य सगळ्यांच्या विकासासाठी पूरक असतात. एकमेकांच्या विकासासाठी उपयुक्त असतात. हेच कुटुंबातील सौंदर्य आहे. कुटुंबात कुणी अधिकारी, कुणी मालक नाही आणि कुणी कुणाला कह्यात ठेवण्याचा प्रयत्न करू नये. त्यांनी एकमेकांच्या नाशास कारणीभूत होवू नये. स्वामी म्हणत, पूर्वी भावंडांमध्ये सर्वोच्च प्रेम असे. आता मात्र ते एकमेकांना सर्वोच्च न्यायालयापर्यंत नेतात. हे असे होत कामा नये. एकमेकांमध्ये पूर्ण प्रेम, स्वातंत्र्य आणि आनंद असावा. भावंडांमध्ये, कुटुंबामध्ये कुठलेही राजकारण नसावे. असे स्वामी म्हणत. ''असे आदर्श स्वामी कुटुंब आणि आदर्श कुटुंब हेच साई कुटुंब'' म्हणून स्वामी आपल्या सगळ्यांकडून, सगळ्या गृहस्थाश्रमींकडून येणाऱ्या काळात आदर्श कुटुंबाची अपेक्षा करतात.

साईराम...